वशीनं./मनपा/अग्नि व आणीबाणी /१८५२/१२-१३
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
दिं. ०४/०७ /२०१२.

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## अग्निशमन व आणीबाणी सेवा

## जाहीर निवेदन

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्राकरीता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसरंक्षक उपाययोजना अधिनियम २००६ [महा.२००७] हा अधिनियम लागु करुन घेतला आहे.अधिनियमांच्या तरतुदीनुसार महापालिकाहद्दीतील शासकीय,निमशासकीय,सार्वजनिक प्राधिकरणे,सार्वजनिक वापराच्या व लोकांच्या वर्दळ असलेल्या खाजगी इमारती या ठिकाणी जनतेच्या जिवितास हानी पोहचु नये याकरीता आग प्रतिबंधक व जीवसरंक्षक उपाययोजना करणे बंधनकारक केले आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये अधिनियमाची काटकोरपणे अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसरंक्षक उपाययोजना अधिनियम २००६ कलम ९ अन्वये लायसन्स प्राप्त अभिकरण म्हणून नेमणुका करणेत येणार आहेत.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे नियमातील तरतुदीनुसार शैक्षणिक पात्रता व अर्हता धारण करणा-या सांगली,सातारा,कोल्हापुर या ठिकाणीच्या पात्र व्यक्तीनी किंवा सस्थांनी अधिनियमातील नमुना म मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकडे दिंनाक १६/०७/२०१२ पर्यत कार्यालयीन वेळेपर्यत पोहोचतील अशा पध्दतीने अर्ज करावेत.

प्र मुख्य अग्निशमन अधिकारी
सांगली मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका.